मुख्य महानगर दंडाधिकारी, माझगाव कोर्टासाठी बांधण्यात आलेल्या तात्पुरत्या शेड मध्ये न्यायालयीन दस्तऐवज ठेवण्यासाठी /जतन करण्यासाठी कॉम्पॅक्टर बसविण्याकरीता येणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
शासन निर्णय क्र. संकीर्ण -०२१८/प्र.क्र.४९/का-११,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १४ मार्च, २०१८.

<u>वाचा</u> :- १. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे क्र.बी (डब्ल्यू) ६०४२ ऑफ १९९१-३१३/४९०९, दि. ६/२/२०१८ रोजीचे पत्र.
२. मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई यांचे क्र. २५५/ २०१८, दि.१६/१/२०१८ चे पत्र.

प्रस्तावना :

मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट याचिका क्र.८११/२०१५ मध्ये दि.१५/२/२०१८ रोजी मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार मुख्य महानगर दंडाधिकारी, माझगाव कोर्टासाठी बांधण्यात आलेल्या तात्पुरत्या शेड मध्ये न्यायालयीन दस्तऐवज ठेवण्यासाठी /जतन करण्यासाठी कॉम्पॅक्टर बसविण्याकरीता येणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई यांनी संदर्भ क्र.२ येथील पत्रान्वये विनंती केल्यानुसार मुख्य महानगर दंडाधिकारी, माझगाव कोर्टासाठी बांधण्यात आलेल्या तात्पुरत्या शेड मध्ये न्यायालयीन दस्तऐवज ठेवण्यासाठी /जतन करण्यासाठी कॉम्पॅक्टर बसविण्याकरीता येणाऱ्या रु. १,७८,५९,९९६/-(रु. एक कोटी अठ्ठ्याहत्तर लाख एकोणसाठ हजार नऊशे शह्याण्णव फक्त) इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर खरेदी शासन विहीत पध्दतीनुसार करण्यात यावी.

३. या करीता होणारा खर्च मागणी क्र. “जे-१ २०१४ न्यायदान, (००)१०७ इलाखा शहर दंडाधिकारी न्यायालये, (००), (००) (०१) इलाखा शहर दंडाधिकारी न्यायालये, (अनिवार्य) (२०१४ ०२३४) १३ कार्यालयीन” या लेखाशिर्षाखालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम भाग-२, दि.१७/४/२०१५ आणि वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८, भाग-पहिला, उप विभाग-दोन, महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम, १९६५ अन्वये प्रदान करण्यात आलेले वित्तीय अधिकार मधील अ.क्र. ३७, नियम-९० अन्वये प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

५. वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०१८/प्र.१७/१८/कोषा.प्रशा-५, दि.२९/१/२०१८ अन्वये दि.१/२/२०१८ तसेच त्यानंतर कोणत्याही खरेदीस निर्बंध घालण्यात आले असल्यामुळे, सदर खरेदीस सूट देण्यासाठी वित्त विभागाने त्यांच्या अनौपचारीक संदर्भ क्र.२६५/१८व्यय-५, दि.५/३/२०१८ व अनौपचारीक संदर्भ क्र. ९४/२०१८/को.प्र.-५, दि.८/३/२०१८ अन्वये दिलेल्या मान्यतेने प्रस्तुत शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०३१४१२३९००६९१२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Anita Dipak Ripote

Digitally signed by Anita Dipak Ripote
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law And Judiciary Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=28bdb8b03e204307a26238ccccb76a2c1eaa9ed4838f450b88dfb9ca9793b4b5, serialNumber=25e18795e96deb90b1428c41cb6c87bc90c3bb1f0ea059da3e0a07a3bc00c6c8, cn=Anita Dipak Ripote
Date: 2018.03.14 12:40:43 +05'30'

(अनिता रिपोटे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई.
२) प्रबंधक (निरीक्षणे-१), उच्च न्यायालय, मुंबई.
३) मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई.
४) महालेखापाल-१(लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
५) लेखा व अधिदान अधिकारी, मुंबई.
६) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
७) वित्त विभाग/व्यय-५, मंत्रालय, मुंबई.
८) विधि व न्याय विभाग-कार्यासन २३, २४ मंत्रालय, मुंबई.
९) निवडनस्ती/कार्या ११.

****